**साक्रोसांग्तूम कॉन्सीलियूम - पवित्र उपासनेवरील घटना**

साक्रोसांग्तूम कॉन्सीलियूम ची पहिलीच ओळ धर्मपरिषदेच्या मुख्य उद्दिष्टांचे प्रमाण ठरवते: कॅथलिकांचे पुनरुज्जीवन करणे, ख्रिस्तसभेचे अर्थपूर्ण मार्गाने आधुनिकीकरण करणे, सर्व ख्रिस्ती संप्रदायांच्या एकतेला प्रोत्साहन देणे आणि संपूर्ण जगापर्यंत पोहोचणे. हा दस्तऐवज प्रकट करतो कि दैवी मार्गाने देवाची उपासना करण्याचा एक परिपूर्ण मार्ग देवाच्या प्रेमाने आपल्यासाठी आपल्या संपूर्ण भल्यासाठी तयार केला आहे. जर आपल्याला खरी उपासना म्हणजे काय हे माहित असेल आणि त्यात पूर्णतः सहभागी झालो तर, हि उपासना आपल्याला देवाच्या प्रेमाच्या अधिक जवळ नेत असते. परिपूर्ण सत्य आणि प्रेम शोधण्याचे आणि मिळवण्याचे उपासना हे एक साधन आहे.उपासनेमध्ये सहभागी होणे म्हणजे ख्रिस्ताच्या ख्रिस्तसभेतील उपस्थितीला प्रतिसाद देणे. उपासना ही चर्चची आराधना आहे. सात संस्कार व देऊळमातेचे प्रार्थना (लिटर्जी ऑफ दि आवर्स) उपासनेमध्ये अंतर्भूत आहे.

मिस्साबलिदानाला पवित्र उपासना म्हणून संबोधले जाते. मिस्साबलिदान आपल्याला ख्रिस्ताच्या दुःखसहन, मरण, पुनरुत्थान व स्वर्गरोहणाच्या पास्काच्या रहस्यात सहभागी करत असते कारण ख्रिस्त उपासनेत उपस्थित असतो. मिस्साबलिदानाद्वारे व देवाच्या शब्दाद्वारे ख्रिस्ताचे प्रेम विशेषरित्या आपल्यापर्यंत वाहत असते. उपासना ख्रिस्तसभेचा सोहळा आहे व त्याद्वारे ख्रिस्तामधील आपले ऐक्य दर्शविले जाते. वैयक्तिक प्रार्थना व भक्ती जरी अर्थपूर्ण असल्या तरी पवित्र उपासना आपल्या जीवनाचा उगम व कळस आहे: आपण जे आहोत व जे घडू शकतो त्याची सुरुवात व अंत.

देवावरील तसेच इतरांवरील आपले प्रेम अधिक गाढ करण्यासाठी मिस्साबलिदान साजरे केले जाते. देवाचा शब्द हा उपासनेचा अधिक चैतन्यशील भाग बनावा असे पवित्र उपासनेवरील घटना स्पष्ट करते. प्रौढांच्या धर्मशिक्षणाची पुनर्स्थापना करण्याचा प्रस्ताव धर्मपरिषदेच्या पितरांनी मांडला. जडणघडण व शिक्षणासाठी एक विशिष्ट वेळ बाजूला ठेवण्यात आला. दृढीकरण संस्काराचे स्नानसंस्काराशी असलेले घट्ट नाते अधिक स्पष्ट करत दृढीकरणाच्या विधीचे पुनर्वलोकन करण्यात आले. अंतिम तैलाभ्यंगाच्या संस्काराला नवीन नाव ठेवण्यात आले: रुग्णाभ्यंग संस्कार. जे मृत्यूच्या जवळ आहेत

त्यांच्यासाठी केवळ हा संस्कार राखून ठेवण्यात येऊ नये असे स्पष्ट करण्यात आले. संस्कारांचे तीन उद्दिष्ट असतात: देवाची स्तुती करणे, ख्रिस्ताच्या शरीराची जडणघडण करणे व मानवजातीला पवित्र करणे.

डिव्हाईन ऑफिस (तासांची उपासना - लिटर्जी ऑफ दि आवर्स) हि एक पवित्र प्रार्थना आहे जी आपल्याला ह्या गोष्टीची आठवण करून देते कि प्रत्येक दिवस, प्रत्येक तास व प्रत्येक मिनिट हा पवित्र आहे. ह्याला प्रोत्सहन देण्यासाठी, देवाची दिवसभर अधिकृतरीत्या स्तुती करण्यासाठी दिवसाच्या काही वेळा राखून ठेवल्या गेल्या आहेत. "ऑफिस" हि एक पुरातन परंपरा व एक मौल्यवान खजाना आहे जो ख्रिस्तसभेचे देवाशी ऐक्य साधतो.

ख्रिस्तसभा ख्रिस्ताचे संपूर्ण रहस्य महत्त्वाचे मानते आणि म्हणूनच ते रहस्य उपासना वर्ष म्हणून तयार केले गेले आहे. आपल्या तारणाचे रहस्य साजरे करणारे व त्याचे स्मरण करणारे हे एक ठरवलेले केलेंडर आहे. जन्म व जीवनापासून ते मृत्य व पुरुत्थान, ते स्वर्गरोहण व परत येण्याच्या वचनापर्यंतची येशूची गोष्ट साजरी करण्यासाठी हे त्रैवार्षिक उपासना चक्र आहे.

धर्मपरिषदेच्या पितरांनी म्हटले आहे कि उपासनेत अंतर्भूत करण्यात आलेली सर्व कला व संगीत हे देवाकडे आपले मन प्रार्थनापूर्वक वळवण्यास कटिबद्ध असले पाहिजे. त्यांनी विश्वासाला प्रोत्साहन दिले पाहिजे व प्रार्थना करण्यासाठी व देवाशी एक होण्यासाठी आपली हृदये उंचावली पाहिजेत. बांधण्यात येणाऱ्या चर्च इमारतींची रचना विशेषत: धार्मिक विधी लक्षात घेऊन करण्यात यावी. आतील रचना अशा प्रकारे मांडली पाहिजे की ती सक्रिय सहभागास प्रोत्साहन देईल.

**चर्चेसाठी प्रश्न:**

दुसरी व्हॅटिकन धर्मपरिषद पवित्र उपासनेला ख्रिस्तसभेच्या जीवनाचा "उगम व कळस" मानते (क्र. १०). "मिस्साबलिदान ख्रिस्ताच्या याजकपणाचे प्रमूख प्रकटीकरण आहे". दुःखासहन "हे फक्त एक आठवण म्हणून राहावी हा हेतू नव्हता तर एक जागृत सत्य जे ख्रिस्तसभेच्या हृदयात कायम उपस्थित

राहील." हि येशूची प्रथम पित्याला व नंतर आपल्याला एक भेट आहे. उपासना व मिस्साबलिदानातील बलिदान ख्रिस्तसभेसाठी काय करते असे तुम्हाला वाटते?

"सक्रिय" सहभागी होण्याचा अर्थ "काही गोष्टी करणे" असा होत नाही. आपण ख्रिस्ताच्या कृपेने पवित्र वाढतो, आपल्या स्वतःच्या निवडीने नाही. ख्रिस्तसभेने अधिकृतपणे ठरवलेली सार्वजनिक प्रार्थना व उपासनाविधी मध्ये आपण काय करतो ह्यापेक्षा जास्त आपल्यासोबत काय घडत आहे ह्याची तुम्हाला जाणीव आहे का? देवाच्या इच्छेचा मरीयेने केलेल्या स्वीकाराचा विचार करा, तिचा होकार. तुम्हाला अशी वेळ आठवते का जिथं तुम्ही मरीयेप्रमाणे धैर्याने होकार दिला होता आणि तुमच्या परिवर्तनासाठी देवाला परवानगी दिली होती?

"पवित्र शांतता हि सक्रिय सहभागासाठी पूर्व शर्त आहे" मिस्साबलीदानात पाळली जाणारी शांतता तुम्हाला किती सोयीस्कर वाटते? तुम्हाला हे मिस्साबलिदानातील प्रभावपूर्वक साधन वाटते का? जर असेल तर कसे? जर नसेल तर का?

*(**फा. सॅवियो डी सेल्स** हे मुंबई सरधर्मप्रांताच्या उपासना समितीचे सचिव आहेत व संत अंतोनि चर्च, वाकोला येथे ते सहाय्यक धर्मगुरू आहेत.)*